CMYK

रखडलेली कामे मार्गी लावून मतदारसंघाचा सर्वांगिण विकास करण्यावर भर >>पान 2

शहरातील सर्व प्रलंबित कामे पूर्ण होणार >>पान 3

बुलढाण्यात महायुतीत ठिणगी... >>पान 4

# दैनिक आपला विदर्भ

**सुविचार**
स्वत:ला ओळखा आणि आपल्या क्षमतांवर विश्वास ठेवा.

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



सुबोध भावेला मिळतोय मुलींकडून नकार

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 111 ■ रविवार, दि. 01 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राज्यात सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा

## ५ डिसेंबरला नव्या सरकारचा शपथविधी सोहळा होणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यात सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला असून येत्या ५ डिसेंबर रोजी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. याबाबत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माहिती दिली.**





राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. २३ नोव्हेंबर रोजी एकत्रित निकाल जाहीर झाले. २८८ सदस्य असलेल्या विधानसभेत २३५ जागा महायुतीच्या वाट्याला गेल्या. त्यामुळे महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. परंतु, निर्विवाद बहुमत मिळाल्यानंतरही महायुतीकडून सत्ता स्थापनेकरता उशीर करण्यात आला. मुख्यमंत्री आणि इतर मंत्रिपदाकरता जोरदार रस्सीखेच अद्यापही सुरू आहे. त्यामुळे राज्यात नवं सरकार कधी स्थापन होणार असा प्रश्न सातत्याने विचारला गेला. दरम्यान, आता भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्स पोस्ट करून शपथविधीबाबत महत्त्वाची माहिती दिली. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता शपथविधी सोहळा होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानात हा सोहळा रंगणार असून यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही येणार आहेत.

राज्यात मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून अद्याप तिन्ही पक्षांमध्ये सहमती झालेली नाही. महायुती सरकारच्या रचनेबाबत अमित शहा यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गुरुवारी रात्री सुमारे तीन तास बैठक पार पडली. या बैठकीत मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस हेच असतील, हे स्पष्ट करण्यात आले. पण काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मागण्यांमुळे गाडी अडल्याचे सांगण्यात येते. एवढे प्रचंड बहुमत मिळूनही विधिमंडळ नेता निवडीसाठी आमदारांची साधी बैठकही अद्याप होऊ शकलेली नाही. भाजपच्या आमदारांमध्येही ही अस्वस्थता जाणवते.

एक मुख्यमंत्री अन् दोन उपमुख्यमंत्री

दरम्यान, आज माध्यमांशी संवाद साधताना राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महत्त्वाची माहिती दिली. भाजपाचा मुख्यमंत्री होणार असून महायुतीतील इतर दोन प्रमुख घटकपक्षातील प्रत्येकी एक-एक असे दोन उपमुख्यमंत्री राज्याला लाभणार आहेत, अशी माहिती अजित पवारांनी दिली.

### पराभव विरोधकांच्या जिव्हारी लागल्याने ते रडीचा डाव खेळत आहे ; अजित पवार यांची विरोधकांवर टिका



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** :पराभव विरोधकांच्या जिव्हारी लागल्याने ते रडीचा डाव खेळत आहेत.अशी बोचरी टिका राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना विरोधकांवर केली.

यावेळी ते पुढे म्हणाले की, विधानसभेचा निकाल विरोधकांच्या एवढा जिव्हारी लागला आहे की ते निकाल सहनच करु शकत नाहीत. त्यामुळे ते आता वेगवेगळ्या गोष्टी काढायला लागले आहेत. ईव्हीएममध्ये दोष आहे. मात्र वास्तविक बघता मशीनमध्ये काही दोष नाहीये, मी बाबा आढाव यांना तेच सांगितले,आता निकाल जर त्यांच्या बाजुने लागला असता तर आनंदत्सोव साजरा केला असता,त्यांनी जो काही एकी दाखवण्याचा प्रयत्न केला. पण लोकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला नाही.सुप्रिम कोर्टाने देखील सांगितले आहे. ईव्हीएममध्ये काही दोष नाही. ईव्हीएममध्ये जर काही घोटाळा असेल तर त्यांनी तो सिद्ध करुन दाखवावा, फक्त त्यांचा रडीचा डाव सुरु आहे,त्यांचा दारुण पराभव झाल्याने त्यांच्या पराभवाचे खापर ते ईव्हीएमवर फोडत आहेत आणि योजनांवर आक्षेप घेत आहेत.

अंदाजे ५ डिसेंबरला शपथविधी होईल, त्यानंतर खाते वाटप होईल. शिंदे नाराज नाहीत भाजपकडे १३२ जागा तर साहाजिकच त्यांचा मुख्यमंत्री होईल, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते अजित पवार यांनी व्यक्त केले.

### काँग्रेसच्या आरोपांवर निवडणूक आयोग देणार उत्तर

नवी दिल्ली : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील मतदारांची नोंद आणि मतदानाच्या टक्केवारीबाबत काँग्रेसच्या भीतीचे निराकरण करण्यासाठी, निवडणूक आयोगाने त्यांच्या शिष्टमंडळाला ३ डिसेंबरला भेटण्यासाठी आमंत्रित केले आहे. निवडणूक आयोगाने म्हटले आहे की ते काँग्रेसच्या सर्व न्याय्य चिंतांचा आढावा घेईल आणि पक्षाच्या शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून लेखी उत्तर देईल.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील आकडेवारीतील कथित तफावतप्रकरणी काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे धाव घेत उत्तर मागितले आहे. काँग्रेसच्या तक्रारीची दखल घेत निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या शिष्टमंडळाला पाचारण केले आहे. आयोगाने काँग्रेसच्या शिष्टमंडळाला सोमवारी बैठकीसाठी बोलावले आहे. आयोगाने आपल्या सुरुवातीच्या उत्तरात निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर भर दिला आहे. निवडणूक आयोगाने काँग्रेसच्या सर्व न्याय्य समस्यांचा आढावा घेण्याचे आणि त्यांचे म्हणणे ऐकून लेखी उत्तर देण्याचे आश्र्वासन दिले आहे. याशिवाय मतदार यादी अद्ययावतीकरणाच्या प्रक्रियेत राजकीय पक्षांचा सहभाग आणि पारदर्शकता यावरही भर देण्यात आला आहे.

मतदानाच्या आकडेवारीत कोणतीही अनियमितता नसल्याचे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. ही आकडेवारी वं उमेदवारांना मतदान केंद्रानुसार उपलब्ध आहे आणि ती तपासली जाऊ शकते. सायंकाळी ५ वाजेची आकडेवारी आणि अंतिम मतदान आकडेवारीमधील फरक प्रक्रियात्मक प्राधान्यांमुळे आहे. पीठासीन अधिकाऱ्यांना मतदान संपण्यापूर्वी अनेक कायदेशीर कर्तव्ये पार पाडावी लागतात. त्यानंतरच ते मतदानाची आकडेवारी अद्यतनित करतात. यापूर्वी २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांदरम्यान निवडणूक आयोगाने रात्री पावणेबारा वाजता एक प्रेस नोट जारी केली होती. अतिरिक्त माहिती प्रदान करण्याचा हा एक मार्ग होता. त्यानंतर सर्वच विधानसभा निवडणुकीत हेच झाले आहे, असेगही आयोगाने म्हटले आहे.

### हरलेल्यांना आणि जिंकलेल्यांना देखील निकालावर विश्वास नाही माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची टिका



दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीत हरलेल्यांना आणि जिंकलेल्यांना देखील निकालावर विश्र्वास नाही, अशी टिका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी येथे माध्यमांशी बोलताना केली. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे म्हणाले की,आजचा दिवस लक्षात राहणारा आहे. बाबा आढाव प्रेरणा देणारे आहेत आणि प्रेरणा कधी म्हातारी होऊ शकत नाही, हरलेल्यांना आणि जिंकलेल्यांना देखील या निकालावर विश्वास नाही, वनवा पेटवायला एक ठिणगी पुरेशी असते. हे आंदोलन म्हणजे ठिणगी आहे. योजनांच्या माध्यमातुन सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्र विकत घेतला. या घोळात एक मोठा विषय इव्हीएमचा आहे. माझे मत कोठे जाते हे समजायला हवे, शेवटच्या एका तासात ७६ लाख मते का वाढली.असा प्रश्र्नही यावेळी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला.

एवढे राक्षसी बहुमत असून देखील महाराष्ट्रात आनंद का नाही असा प्रश्र्न केला. बहुमत मिळून देखील राजभवनात जाण्याऐवजी हे लोक शेतात पुजा - अर्चा करण्यासाठी का जातायत? अमावस्येला पुजा अर्चा करण्यासाठी गेलेत, यावरुन यांची मानसिकता दिसून येते. महाराष्ट्र लेचा पेचा नाही. महाराष्ट्र देशाला दिशा देईल. महाविकास आघाडीतील शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे आंदोलन पुढे नेतील. सत्ता स्थापनेचा हा खोळ जर आमच्या बाबतीत असता तर राष्ट्रपती राजवट लागली असती असे मत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले.

### EVM हॅक करता येतं, मी स्वत: इंजिनिअर, मला सगळ माहितीय; महादेव जानकरांनी सांगितला पुढचा प्लॅन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : मला महायुतीचा अनुभव खूप वाईट आला आहे. त्यामुळं मी त्यांच्यापासून बाहेर आहे. काँग्रेसला अजून चाखल नाही. त्यामुळं त्यांच्याकडे न जाता स्वतंत्र पुढे जायची आमची भूमिका असल्याचे मत राष्ट्रीय समाज पक्षाचे प्रमुख महादेव जानकर यांनी व्यक्त केलं. अनेक ठिकाणी एतच मधे घोटाळा झाल्यामुळं महायुतीच्या जागा निवडून आल्या आहेत. एतच वर माझा आक्षेप आहे, देशभरात आम्ही याविरोधात आंदोलन करु असा इशारा जानकर यांनी दिला आहे. मी स्वत: इंजिनियर, एतच हॅक करता येत, त्यामुळं मला सगळं माहित असल्याचे जानकर म्हणाले.



महायुतीला एवढं बहुमत आलं आहे, त्यामुळं राज्याचा मुख्यमंत्री कोण बसवायचं? हे त्यांचं ते ठरवतील असे जाकर म्हणाले. महायुतीला एवढं यश मिळालं असताना निर्णय घेत नाहीत त्यावर मी काय बोलणार? असेही जानकर म्हणाले. भाजप कोणाला सरप्राइज मुख्यमंत्री करेल? यात मला आजिबात पडायचं नाही असंही ते म्हणाले. मला महायुतीचा अनुभव खूप वाईट आला आहे, त्यामुळं मी त्यांच्यापासून बाहेर असल्याचे जानकर म्हणाले.

अनेक ठिकाणी एतच मध्ये घोटाळा झाल्यामुळं महायुतीच्या जागा निवडून आल्या असल्याचे महादेव जानकर म्हणाले. एतच वर माझा आक्षेप आहे, देशभरात आम्ही याविरोधात आंदोलन करु असा इशारा त्यांनी दिला. एतच मुळे देशाची लोकशाही धोक्यात आली आहे. एतच हॅक करता येतं, मी स्वत: इंजिनिअर आहे. त्यामुळं मला सगळं माहीत असल्याचे जानकर म्हणाले.

सुप्रीम कोर्ट, निवडणूक आयोग सगळे त्यांचे आहे, त्यामुळं याला लोकशाही म्हणता येणार नाही. लोकशाहीचा खून करण्याच काम झालं असल्याचे जानकर म्हणाले.

माझ्या पक्षाचा सध्या एकच आमदार आहे, कोणासोबत जायचं याचा अजून निर्णय झालेला नाही. पण जर त्याने पक्षाला न विचारता काही निर्णय घेतला तर त्यावर नक्की आम्ही कारवाई करु असे म्हणत महादेव जानकर यांनी गंगाखेडचे आपल्याच पक्षाचे आमदार रत्नाकर गुट्टे यांना इशारा दिला आहे. मला सगळ्या गोष्टीच्या ठेचा लागल्या आहेत. त्यामुळं मी सगळ्या गोष्टी माझ्या ताब्यात ठेवल्या आहेत. त्यामुळं माझा एक आमदार असला तरी तो पक्षावर दावा सांगू शकत नाही असेही जानकर म्हणाले.

### बहुमत असताना सुद्धा राज्याला मुख्यमंत्री का मिळत नाही? संजय राऊत यांचा सवाल

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यात आता झालेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळून सुद्धा राज्याचा मुख्यमंत्री अजून घोषित झाला नाही. यावरून उबाठा नेते, खासदार संजय राऊत यांनी महायुतीला टोला लगावला आहे. ''राज्यात भाजपाचाच मुख्यमंत्री होणार असून देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असं सांगितलं जाते. परंतु याबाबत घोषणा कधी होणार? की आणखी कोणाचं नाव समोर येणार, ते माहित नाही,'' असंही संजय राऊत म्हणाले आहेत. मुंबईत ते बोलत होते.

याप्रसंगी बोलताना संजय राऊत म्हणाले की, ''राज्यात म हायुतीचा जो विजय झाला आहे तो खरा नाही. रात्री साडेअकरा वाजेपर्यंत कुठं मतदान सुरू होतं हे निवडणूक आयोगानं आम्हाला सांगितलं पाहिजे. राज्यात एकूण ७६ लाख मतदान वाढलं आणि महायुतीला बहुमत मिळालं. हरियाणामध्ये सुद्धा १४ लाख मतं वाढली आणि भाजपा सत्तेत आली. त्या पद्धतीनंच महाराष्ट्रात सुद्धा ७६ लाख मतदान वाढले आणि भाजपा सत्तेत आली,'' असा आरोपही संजय राऊत यांनी केला.

एकनाथ शिंदे हे त्यांच्या दरेगावात गेले असून तिथे ते मोठा बॉम्बस्फोट करणार असं वक्तव्य आमदार संजय शिरसाट यांनी केलं आहे. यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, ''मोठा निर्णय घेण्यासाठी तशी हिंमत लागते. ज्यांना ईडी, सीबीआयची भीती आहे, असे लोक मोठा निर्णय घेऊ शकत नाहीत. आता एकनाथ शिंदे यांच्या डोळ्यात चमक दिसत नाही, ते हसत सुद्धा नाहीत. महायुतीकडं २०० पार संख्याबळ असताना सुद्धा राज्याला अजून मुख्यमंत्री भेटत नाही,'' असा टोलाही राऊत यांनी लगावला आहे.

### पुणे-सातारा महामार्गावर कंटेनरची मोटारीला धडक ; एकाच कुटुंबातील चौघे जखमी, अपघातानंतर वाहतूक विस्कळीत

**पुणे/प्रतिनिधी** : कंटेनरच्या धडकेत मोटारीतील चौघे जण जखमी झाल्याची घटना पुणे-सातारा महामार्गावर देगाव फाटा परिसरात शनिवारी घडली. अपघातात मोटारीतील साडेतीन वर्षाच्या बालिकेसह चौघेजण जखमी झाले. अपघातानंतर देगाव फाटा परिसरातील वाहतूक विस्कळीत झाली. अपघातग्रस्त कंटेनर आणि मोटार क्रेनच्या सहायाने बाजूला काढल्यानंतर या भागातील वाहतूक सुरळीत झाली.

सर्जेराव सखाराम पाटील (वय ६०), बायक्का सर्जेराव पाटील (वय ५०), प्रवीण सखाराम पाटील (वय ३५), इरा प्रवीण पाटील (वय साडेतीन, सर्व रा. दरेवाडी, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत.

## गृहमंत्रीपदी डॅशिंग नेता हवा, अर्थखात्याचा कारभारही सक्षम माणसाच्या हातात हवा; शिंदे गटाच्या नेत्याने शड्डू ठोकला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याचं मुख्यमंत्रीपद भाजपकडे जाणार असले तर गृहमंत्रीपद आमच्याकडे असावे, हा नैसर्गिक नियम आहे. ते खातं आमच्याकडे असायला हरकत नाही. गृहखात्यावर एखादा डॅशिंग नेता असायला पाहिजे, असे वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी केले. संजय शिरसाट यांच्या या वक्तव्यामुळे एकनाथ शिंदे हे गृहखाते शिवसेनेला मिळण्याबाबत अजूनही ठाम असल्याचे संकेत मिळत आहे. अमित शाह यांच्या निवासस्थानी गुरुवारी रात्री झालेल्या बैठकीनंतर एकनाथ शिंदे नाराज झाल्याची चर्चा रंगली आहे. दुसऱ्याच दिवशी एकनाथ शिंदे हे सगळ्या राजकीय घडामोडींपासून अलिप्त होत साताऱ्यातील आपल्या गावी निघून गेले होते. त्यामुळे महायुतीच्या खातेवाटपाची बैठक लांबवणीवर पडली आहे. अशातच आता संजय शिरसाट यांनी शिवसेनेला गृहमंत्रीपद मिळणे, आमचा नैसर्गिक हक्क असल्याचा दावा केला आहे. ते शनिवारी मुंबईत प्रसारम ाध्यमांशी बोलत होते.

यावेळी संजय शिरसाट यांनी अर्थखात्याबाबतही टिप्पणी केली. जे देतोय ते लोकांपर्यंत पोहोचलं पाहिजे ही एकनाथ शिंदे साहेबांची भूमिका आहे. लाडकी बहीण योजना जाहीर करताना अर्थ खात्याने थोडा विरोध केला होता. १५०० ते २१०० करण्यासाठी हिवाळी अधिवेशनात मान्यता मिळाली हवी. या खात्याचा कारभार देखील सक्षम माणसाकडे जायला हवा, असे संजय शिरसाट यांनी म्हटले.

विरोधकांच्या हातात आता सामूहिक आत्महत्या करण्यापलीकडे काहीही उरलेले नाही. एकनाथ शिंदे हे दिल्लीला जाण्यापेक्षा महाराष्ट्रात खास करून गावी दरेला जातात, तिथून आल्यानंतर पक्षासाठी योग्य तो निर्णय घेतात. ईव्हीएमबाबत जे प्रश्न उपस्थित करत आहेत, तो त्यांचा पराभवानंतरचा केविलवाणा प्रयत्न आहे. राम शिंदेबाबत बोलायचं झालं तर कर्जत जामखेडमध्ये दमदाटीचं राजकारण झालं. शरद पवार ज्या पद्धतीने प्रश्न उपस्थित करत आहेत. एकदा पावसात भिजल्याने सत्ता आली. वारंवार भिजल्याने येतेच अशी नाही, अशी खोचक टीका संजय शिरसाट यांनी केली.

राज्याचा मुख्यमंत्री कोण? याचं उत्तर अद्याप कोणालाच सापडलेलं नाही. मुख्यमंत्री दरे गावी जात असतात. मोठा निर्णय घेण्यासाठी दरेगाव त्यांचं आवडीचं ठिकाण आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी परखडपणे सांगितलं आहे की, सरकार स्थापन करण्यात माझा अडसर नाही. वरिष्ठ नेत्यांचा निर्णय पक्ष आणि मी बांधील असल्याचं स्पष्ट वक्तव्य केलं आहे . दिल्लीतील बैठकीत देखील त्यांनी ते सांगितलं आहे. आता भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घ्यायचा आहे. कोणाला मुख्यमंत्री करावं हा निर्णय मोदी आणि अमित शहा यांनी घ्यावा. का वेळ लागतोय याची कल्पना नाही.



परिवर्तन होत तेव्हा मुख्यमंत्र्यांचं नाव जाहीर झाल्यानंतर खातेवाटपावर चर्चा होते. काही विद्वान सरकारवर टीका करत आहेत. अजूनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत, सरकार वाऱ्यावर सोडलेलं नाही. सोमवारी भाजपचे निरीक्षक येणार आहेत, असे समजते. शिंदे का दरेगावला गेले याबद्दल चर्चा करण्याची गरज नाही. आम्ही लाचारसारखं नाटकं करणारी लोक नाही. आम ची नाराजी आम्ही उघडपणे जाहीर करु. लाचारीत ज्यांनी अडीच वर्ष घालवली, त्यांच्या टीकेत काही अर्थ नाही, असे संजय शिरसाट यांनी म्हटले.

CMYK

## द किंग इज बॅक

रात्री नंतर सकाळ होतेच.... अंधारातून मार्ग काढला की प्रकाश दिसतोच मात्र हीच सकाळ आणि प्रकाश पाहण्यासाठी आपल्याकडे हवा तो संयम आणि स्वतः च्या क्षमतेवर असलेला विश्वास. जर स्वतःच्या क्षमतेवर विश्वास असेल आणि कितीही कठीण काळ आला तरी संयम सोडला नाही तर अपयशाची साखळी तोडून माणूस यशाची शिखरे गाठतोच. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भारताचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज विराट कोहली. गेली दीड वर्ष विराट कोहली हा अपयशाच्या गर्तेत सापडला होता. धावांची रास उभारणारी विराट कोहलीची बाब त्याच्यावर रुसली होती. शतकाचे इमले उभारणाऱ्या विराटला मागील दीड वर्षात कसोटीत एकही शतक झळकावता आले नाही त्यामुळे त्याच्यावर टीका होऊ लागली. काही महाभागांनी तर त्याला संघाच्या बाहेर ठेवण्याची मागणी केली. स्वतःला क्रिकेटचे तज्ज्ञ म्हणवून घेणारे देखील विराटवर टीका करू लागले. मीडियात देखील विराटवर हल्ला होऊ लागला. विराटचा हरवलेला फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय ठरला होता. विराट मात्र टिकाकरांकडे दुर्लक्ष करून आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करत होता. टिकाकारांच्या टीकेला उत्तर देण्यात त्याने वेळ घालवला नाही तो नेहमी म्हणत असत की मला फक्त एका मोठ्या खेळीची गरज आहे. ती जर आली की मी पुन्हा फॉर्मात येईल कारण त्याचा स्वतःचा क्षमतेवर विश्वास होता. त्याला हवी असलेली मोठी खेळी ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पर्थ मधील पहिल्या कसोटीत आली. पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात विराटने धडाकेबाज नाबाद शतक झळकावले आणि भारताला जुना विराट सापडला. विराट पुन्हा फॉर्मात आला. द किंग इज बॅक....असाच इशारा त्याने या खेळीने जगाला दिला. टी २० विश्वचषकातही त्याला म्हणावा तसा फॉर्म सापडला नव्हता मात्र दक्षिण आफ्रिके विरुद्ध महत्वाच्या अंतिम सामन्यात त्याने अविश्वसनीय अर्धशतकी खेळी करून भारताला विश्वविजय मिळवून दिला मात्र पुन्हा त्याचा फॉर्म हरपला नुकत्याच झालेल्या बांगलादेश व न्युझीलंड विरुद्धच्या कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याला धावा काढता आल्या नाहीत मात्र ऑस्ट्रेलिया विरुद्ध त्याने आपल्या शतकी तडाखेबंद खेळीने भारताला एकहाती विजय मिळवून देताना अनेक विक्रमांना गवसणी घातली. या शतका बरोबरच त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. हे त्याचे कसोटीतील ३० वे शतक आहे. हे त्याचे ऑस्ट्रेलियातील सातवे शतक आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक कसोटी शतक झळकावणारा भारतीय असा विक्रम आता त्याच्या नावावर जमा झाला आहे. पूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता त्याने ऑस्ट्रेलियात सहा कसोटी शतके झळकावली आहेत. विराट कोहलीच्या नावावर आता एकूण ८१ शतक आहेत. कसोटीत ३०, एकदिवसीय सामन्यात ५० तसेच टी २० सामन्यात १ असे एकूण ८१ शतके त्याच्या नावावर जमा झाली आहेत. ८० पेक्षा अधिक शतके झळकावण्याचा पराक्रम करणारा सचिन नंतरचा तो दुसराच खेळाडू आहे. सध्या खेळत असणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. सध्याची कामगिरी पाहता तो लवकरच विक्रमविर सचिन तेंडुलकर यांचा १०० शतकांचा विक्रम लवकरच मोडेल यात शंका नाही. मागील दीड वर्षाचे अपयश मागे टाकून तो पुन्हा आपल्या जुन्या अवतारात परतला आहे हे भारतासाठी शुभचिन्ह आहे. विराट पुन्हा फॉर्मात आल्याने या वर्षी तो धावांचा रतीब घालणार यात शंका नाही. यावर्षी भारत अनेक मोठ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या मोठ्या स्पर्धेत विराटचा फॉर्म भारताला विजय मिळवून देईन. यावर्षी एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी तसेच विश्व कसोटी अजिंक्यपद देखील आहे. जर विराटचा हा फॉर्म असाच राहिला आणि त्याला संघातील इतर खेळाडूंनी साथ दिली तर यावेळी भारत या दोन्ही महत्वाच्या स्पर्धेत अजिंक्यपद मिळवेल यात शंका नाही. विराट अजूनही तरुण आहे त्याचा फॉर्म परत आला आहे आणि त्याच्या फिटनेसवर तर शंकाच नाही संघातील सर्वाधिक फिट खेळाडू हा विराटच आहे त्यामुळे तो आणखी तीन चार वर्ष सहज खेळू शकतो या दरम्यान तो सचिनचा १०० शतकांचा विक्रम सहज मोडू शकतो. सचिनचा विक्रम जर कोणी मोडू शकेल तर तो फक्त विराटच आहे कारण आज त्याच्या नावे ८१ शतकांची नोंद आहे. सध्या खेळणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. त्यामुळे सचिनचा विराट विक्रम विराट कोहलीच मोडेल यात शंका नाही.

## सुबोध भावेला मिळतोय मुलींकडून नकार

**मुंबई/प्रतिनिधी** : शुभम फिल्म प्रॉडक्शनच्या 'हॅशटॅग तदेव लग्नम्' या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहात असतानाच आता या चित्रपटातील एक धमाल गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. क्षितिज पटवर्धन लिखित 'नकारघंटा' असे बोल असलेलं हे गाणं सुबोध भावेवर चित्रित करण्यात आलं असून पंकज पडघन यांनी संगीतबद्ध केलेल्या या गाण्यात आदर्श शिंदे यांच्या दमदार आवाजानं अधिकच रंगत आणली आहे.

'हळूच मनाचं दार उघडून, रोज नवी येते आणि जाते वाजवून घंटा नकारघंटा' या ओळींमधूनच साधारण कल्पना प्रेक्षकांना आली असेलच. विवाहेच्छुक सुबोध भावे लग्नासाठी मुली बघताना दिसत असून अपेक्षांमध्ये न बसल्याने त्याला बहुतेक स्थळांकडून नकारच मिळत असल्याचं या गाण्यातून दिसतंय. सुबोधच्या आयुष्यातील ही नकारघंटा थांबून, तो बोहल्यावर चढणार का? हे उत्तर जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना २० डिसेंबरपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. आनंद दिलीप गोखले लिखित, दिग्दर्शित या चित्रपटात सुबोध भावे, तेजश्री प्रधान, प्रदीप वेलणकर, मानसी मागिकर, संजय खापरे, शर्मिष्ठा राऊत यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तर शेखर विठ्ठल मते या चित्रपटाचे निर्माते आहेत. गाण्याबद्दल दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले म्हणतात, 'चित्रपटाची कथा पुढे नेणारं हे एक मजेदार गाणं आहे. वय वाढलं की लग्न जमवणं हे एक मोठं आव्हान असतं आणि अशातही एखादी मनासारखी मुलगी मिळालीच तर तिच्या अपेक्षांच्या यादीत बसणं, हे त्याहूनही मोठं आव्हान असतं. मग अशा वेळी पचवावा लागतो, तो नकार हेच गंमतीशीररित्या या गाण्यातून दाखवण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. या गाण्याचे बोल, संगीत आणि आदर्श शिंदे यांचा जबरदस्त आवाज हे सगळंच खूप छान जुळून आलं आहे'.

# रखडलेली कामे मार्गी लावून मतदारसंघाचा सर्वांगिण विकास करण्यावर भर

### – आमदार सिद्धार्थ खरात यांची पत्रकार परिषदेत ग्वाही
### – लोणार पर्यटनाचा विकास करण्याबरोबर छत्रपतींचे स्मारकही लवकरच पूर्ण होईल





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर मतदारसंघात जो विकासाचा ढोल बजावण्यात आला त्या प्रमाणे प्रत्यक्षात कोठेही विकास झाल्याचे दिसून येत नसून मतदार संघात अनेक कामे हे रखडलेले आहेत.ही रखडलेली कामे पूर्ण करून मतदार संघाचा सर्वांगिण विकास करण्याला बोललो त्या प्रमाणे प्राधान्य राहील, अशी ग्वाही नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी मेहकर येथे ३० नोव्हेंबर २०२४ रोजी आयाजित पत्रकार परिषदेत दिली. तसेच यावेळी त्यांनी लोणार शहराचा विकास हा लोणावळा प्रमाणे करण्यावर तर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक तात्काळ पूर्ण करण्याला विशेष प्राधान्य देण्यात येईल,असा विश्वासही यावेळी व्यक्त केला.

येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत मेहकर मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग,जिल्हा परिषद बांधकाम विभाग,जलजिवन मिशन, विजवितरण विभागाचा आढावा घेतला. तेंव्हा विकासाची आकडेवारी समोर येताच आमदार सिद्धार्थ खरात हे संताप व्यक्त करताना म्हणाले की एवढा विकासाचा ढोल बजावला गेला. परंतु, प्रत्यक्षात कोठेही विकास कामे झालेली नाहीत.असा आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला,मतदार संघात सार्वजनिक बांधकाम विभागाची ११४ कामे असून सब स्टेट बजेटसह इतरही विकास कामे आहेत. ६८१ कामे ही अर्धावट आहेत. विकासाच्या आकडेवारी चे जे बॅनर लावले गेले,तो विकास म्हणजे फक्त आणि फक्त कागदावर आहेत. अनेक कामे मंजूर आहेत परंतु यांना सोईचे राजकारण करण्यासाठी ते मुद्दाम प्रलंबित ठेवल्याचा आरोपही यावेळी आमदार खरात यांनी केला. तर आता निवडणुक झाली आहे आता शेत रस्ते,पांदण रस्ते जलजीवन मिशन अंतर्गत गावाला पिण्याच्या पाण्याची, व्यवस्था करण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. वारकरी चळवळीला बळ देणार आहे, पत्रकारांसाठी पत्रकार भवन उभारणार आहे. शहरातील रस्त्यावरील दुभाजक बाबतीत सर्वसमावेशक भूमिका घेणार आहे.निवडणुकीच्या काळात आरोप प्रत्यारोप झाले असले तरी आता विकास आणि विकासाच्या मुद्यावर राजकारण, समाजकारण केले जाईल. मतदार संघाचा सर्वांगिण विकास अनुशेष भरून काढण्यासाठी प्राधान्य दिले जाईल, मतदार संघात कामासाठी मंजूर असलेला निधी हा अत्यंत तोकडा असून मतदार संघातील कामे मार्गी लावण्यासाठी शासनदरबारी पाठपुरावा केला जाईल, शेतकर्यांना शेतात जाण्यासाठी पादंण रस्ते करण्याचा प्रश्र्न निकाली काढला जाईल, सिंचनासाठी विद्युत पुरवठा मिळत नाही, याबाबत सबस्टेशन निर्मिती करण्यावर भर दिला जाईल.मतदार सघातील मोळामोळी, पांगरखेड, देऊळगाव, वारसा, अंजनी, सरस्वती ही मंजूर असलेली सबस्टेशनची कामे मार्गी लावण्यात येतील,याचबरोबर शेतकर्यांनी दिवसा विज पुरवठा मिळविण्यासाठी मागेल त्याला सौरपंप या योजनेचा लाभ घ्यावा, यासाठी अर्ज करावे, असे आवाहन यावेळी आ. सिद्धार्थ खरात यांनी केले. तर लाडक्या बहिणीसाठी तुर ,कापूस आणि सोयाबीन ला भाव व लाडक्या भावांच्या हाताला काम देणार असल्याचे सांगितले, त्यामुळे लाडक्या बहिणींनी १५०० रुपयापेक्षा भावाच्या हाताला कामाला प्राधान्य दिले आहे. तर मेहकर बसस्थानक इमारतीची चौकशी लावणार आहे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावावर जर राजकारण करता, त्यांचे विचार पेरण्याचे काम आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्र्वारूढ पुतळा आत्तापर्यंत का बसवला नाही असा खडा सवाल त्यांनी उपस्थित केला.

विकासाबाबत माझे काही आराखडे आहेत. येत्या बजेटमध्ये पाच पट विकास कामांचे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे.गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विकास कामांचा बॅकलॉग भरून काढणार असल्याची ग्वाही देत मार्च अगोदर प्रलंबित कामे पूर्ण करणार असल्याचे सांगितले.तर निकालानंतर घडलेल्या घटनेबाबत पत्रकारांनी प्रश्र्न केला असता आ.खरात यांनी पराभूत होऊनही आमची विजयी मिरवणूक अडवली, तरी मी कार्यकर्त्यांना समजाविले आहे.

राजकारणात जय पराजय हा नेहमी होतच असतो, परंतु ज्यांचा विजय झाला त्यांनी उन्माद करायचा नसतो, आमचा विजय झाला आम्ही माघार घेतली ते आमचे संस्कार आहेत. महाराष्ट्र हा सुसंस्कृत सुजान नागरिकांचा आहे. तरुणांचे आयुष्य बरबाद होऊ नये म्हणून आम्ही माघार घेतली, परंतु त्यांनी पराभव होऊनही आमची विजयी रॅली अडवली काय जो गोंधळ घातला, परंतु आता राजकारण संपले आहे.

आता विकासाचे राजकारण करण्यावर भर देण्यात येईल, मेहकर शहरातील पाणी टंचाई, बारा दिवसाआड होणारा पाणी पुरवठा यावर लवकरच उपाय केला जाईल, असे सांगून पत्रकारांच्या इतर प्रश्नांचे निरासन केले.माजी आ. संजय रायमुलकर यांचे आणि माझे वैयक्तिक काही वैर नाही त्यांनी त्यांच्या अनुभवानुसार मार्गदर्शक सूचना कराव्यात.असे मतही यावेळी नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले. या पत्रकार परिषदेला उपजिल्हा प्रमुख प्रा.आशिष रहाटे, काँग्रेसचे विधानसभा नेते अनंतराव वानखेडे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, राष्टवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष दत्ता पाटील घनवट,राष्टवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष निसार अन्सारी, शहर प्रमुख किशोर गारोळे, युवा सेना तालुका अधिकारी आकाश घोडे, शहर अधिकारी ऋषी जगताप, अँड.बाळासाहेब गवई ,साहेबराव हिवाळे सह पदाधिकारी उपस्थित होते.

## मी शुभेच्छांची वाट पाहतोय

निवडणूक काळात आरोप प्रत्यारोप झाले असतील, परंतु माजी आ. संजय रायमुलकर हे काय माझे वैरी नाहीत, त्यांनी विकासकामासाठी मार्गदर्शन करावे, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना मी शुभेच्छा दिल्या. आता निवडणुका संपुष्टात आल्या असून सुसंस्कृत महाराष्ट्रात आणि संताच्या या पावन भूमीत आपल्यावर चांगले संस्कार झालेले आहेत. त्यामुळे आता जय पराजय डोक्यातून काढून विकास कामावर भर देण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी मतदार संघातील सर्वांना केले. तसेच मी शुभेच्छांची वाट पाहतोय असे म्हणून स्मितहास्य दिले.

## 'सामंथाचे वडील सार्वजनिक ठिकाणी दिसणं का टाळायचे?' त्यांनीचं सांगितलं होतं कारण

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : अभिनेत्री सामंथा रुथ प्रभूचे वडील जोसेफ प्रभू यांचं २९ नोव्हेंबर रोजी निधन झालं. सामंथा आणि तिचे वडिल यांचं नातं थोडसं तणावाचं राहिलं होतं. तिनं शिकून मोठं व्हावं अशी इतर सामान्य बापाची जशी इच्छा असते तशीच तिच्या वडिलांचीही होती. परंतु सामंथाच्या मानात काही वेगळंच होतं. याच कारणामुळं दोघांच्यातील नात्यात काहीसा दूरावा निर्माण झाला होता. परंतु ते अतिशय नम्र, शिस्तबद्ध आणि साधेपणा जपणारे व्यक्तिमत्व होतं, याचाही प्रभाव तिच्या व्यक्तिमत्वावर मोठा होता.

सामंथा अभिनेत्री म्हणून यशस्वी होत असताना तिच्या भोवती प्रसिद्धीचं वलय निर्माण झालं होतं. परंतु तिच्याबरोबर कधीच तिचे वडिल अवतीभोवती दिसले नाहीत. २०२३ मध्ये एका चाहत्यांनं जोसेफ प्रभू यांना सामंथाबरोबर कार्यक्रमात का दिसला नाहीत असं विचारलं असता ते म्हणाले होते, ''मला सेलेब्रिटींबरोबर दिसायला आवडत नाही.'' त्यांच्या या उत्तरातून त्यांची विनयशिलता आणि साधेपणानं जीवन जगण्याला दिलेलं प्राधान्य दिसून येतं.



प्रसिद्धीपासून नेहमी चार हात लांब राहण्याचा जोसेफ प्रभू यांचा निर्णय वेगळा ठरला. खरंतर सामंथा चेन्नईतील आपल्या कुटुंबात जोनाथन आणि डेव्हिड या दोन भावांसह मोठी झाली. आपल्या व्यक्तिमत्व जडणघडणीचं संपूर्ण श्रेय सामंथा आपल्या कुटुंबाला देत आली आहे. परंतु तिच्या वडिलांची वागणूक तिच्या जीवनात शांत परंतु महत्त्वपूर्ण प्रभाव पाडणारी होती.

सामंथानं तिच्या वडिलांच्या निधनाची बातमी कळल्यानंतर आपल्या इन्स्टाग्राम पोस्टमधून दुःख व्यक्त केलं. 'बाबा, आपली पुन्हा भेट होत नाही तोपर्यंत', असं म्हणत तिनं तुटलेल्या हृदयाचा इमोजी तिनं शेअर केला होता.

# शिव्या द्याल तर महागात पडेल, ५०० रुपयांचा दंड; 'या' गावातील ठरावाची राज्यभरात जोरदार चर्चा

दैनिक आपला विदर्भ

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** : छोटं भांडण बंद झालं तरी शिव्या देण्याचे प्रमाण अनेकदा समोर येतं. मात्र आता या शिव्या देणाऱ्यांवरच दंडात्मक कारवाईचा कौतुकास्पद निर्णय घेण्यात आला आहे. नेवासा तालुक्यातील सौंदाळा गाव नेहमी समाजहिताचे निर्णय घेत असते यावेळी ग्रामसभेत आई व बहिणीच्या नावाने शिव्या देण्यास बंदी घालण्यात आलीय.

जो शिव्या देईल त्याच्यावर ग्रामपंचायतीकडून दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचा ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आला आहे. सौंदाळेत झालेल्या ग्रामसभेत गावातील महिला व पुरुषांनी गावामध्ये यापुढे शिव्या द्यायच्या नाहीत. जर शिव्या दिल्या तर पाचशे रुपये दंड सक्तीने आकारण्यात येईल, असा निर्णय



घेण्यात आला आहे.

शिव्या देताना आईचा व बहिणीचा कुठलाही दोष नसताना त्यांच्या शारीरिक अवयवा संदर्भात शिवीगाळ करून अर्वाच्य शब्द वापरून स्त्रीचा अपमान केला जातो. त्यामुळे शिव्या देणाऱ्या व्यक्तीने शिव्या देताना आपल्या आई बहिणींना मुलींना आठवलं पाहिजे. त्यामुळे ग्रामपंचायतीने शिव्या देण्यासाठी बंदी घालून महिला भगिनींचा सन्मान करण्यात येणार असल्याचं सरपंचांनी स्पष्ट केलंय. माझ्या पंधरा वर्षाच्या कालावधीत या निर्णयासह अनेक निर्णयात्मक ठराव ग्रामसभेत मंजूर करण्यात आले असल्याची माहिती लोकनियुक्त सरपंच शरद अरगडे यांनी दिली आहे.

सर्वच ग्रामपंचायतींनी असा निर्णय घ्यावा

शरद अरगडे म्हणाले की, आम्ही ग्रामसभेच्या माध्यमातून महिला भगिनींचा सन्मान करण्यासाठी हा ठराव घेतलेला आहे. यापुढे कोणीही शिवी दिली तरी त्याच्याकडून पाचशे रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. दंडाची वसुली ग्रामपंचायतीतून केली जाईल. आमच्या ग्रामपंचायतीने घेतलेला निर्णय हा सर्वच ग्रामपंचायतींनी घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### ग्रामपंचायतच्या कार्य काळात करण्यात आलेले ठराव

१) कन्यादान योजना ५००० रुपये.
२) विधवा सन्मान योजना.
३) पिठाची गिरणी एक रुपये किलो प्रमाणे.
४) गावातील निराधार वृद्धांना ग्रामपंचायत मार्फत रोज मोफत भोजन.
५) २७६ घरकुल मंजूर तालुक्यात गावाला अव्वल स्थान.
६) ५०म दराने सलून.
७) विधवा पुनर्विवाहासाठी ११००० रुपये प्रोत्साहित रक्कम.
८) विधवा भाऊबीज आणि रक्षाबंधन प्रत्येकी १००० रुपये.
९) प्रत्येक दिवाळीला दीड किलो मोफत साखर.
१०) गावात शिवीगाळ बंदी.
११) गावात बालकामगार बंदी... १२) गावात बालविवाह सक्तीची बंदी.
१३) गावात संध्याकाळी सात ते नऊ विद्यार्थ्यांसाठी मोबाईल बंदी.
१४) गावातील व्यापाऱ्यांना बाजारसाठी छत्री वाटप.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# शहरातील सर्व प्रलंबित कामे पूर्ण होणार

## शिवसेना नेते उदय सामंत यांची पत्रकार परिषद ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी** : थ्रीडी मल्टीमीडिया शो चे उद्घाटन २६ जानेवारी रोजी होणार आहे.तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे रिसर्च सेंटर देखील दोन ते तीन महिन्यात पूर्ण होणार असून शहरातील सर्व प्रलंबित कामे पूर्ण होणार आहेत. अशी माहिती शिवसेना नेते उदय सामंत यांनी रत्नागिरी येथे दि.३० नोव्हेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.



यावेळी अधिक माहिती देताना उदय सामंत म्हणाले की, एखादी व्यक्ती बोलते आणि त्यानंतर या चर्चा सुरू होतात. एकनाथ शिंदेंनी जी भूमिका घेतली आहे ती अमित शहा यांना सांगितली आहे. शिंदेच्या काही भूमिका घेतील त्याला आम्ही समर्थन करणार आहोत. २००४ मध्ये सरकार स्थापन होण्यास १५ ते २० दिवस लागले होते.२०१९मध्ये सरकार स्थापन होण्यास ३६ दिवस लागले ते कशासाठी, येत्या दोन दिवसात निर्णय होईल आणि मंत्रिमंडळ आणि मुख्यमंत्री शपथ घेतील.राऊत यांनी एवढी खालच्या पद्धतीने टीका करणे योग्य नाही, मला वाटते सर्वांची वेळ येते, एकनाथ शिंदे यांची प्रतिमा अजिबात कमी होत नाहीये उलट त्यांची प्रतिमा वाढते आहे. जनतेने तुम्हाला जे घरी बसवले आहे त्याचे आत्मचिंतन करावे, संजय राऊत यांनी एकतर्फी शिंदे यांना टार्गेट करणे योग्य नाही, शिंदेंचे जे खच्चीकरण करतात त्या ठाकरे सेनेवरती काय बोलायचे असा प्रश्न यावेळी सामंत यांनी केला.

महाराष्ट्रातील जनतेने त्यांचे अस्तित्व संपवल आहे. राहुल गांधी यांच्या मांडीला मांडी लावून बसणारे हे सर्व लोक आहेत.त ईव्हीएमबाबत आम्ही घाबरत नाही, ४५ हजार रुपये भरलेत ना तपासा, अमेरिकेतून शास्त्रज्ञ आणून देखील तपासावे, पैशाचा वापर झाला असे जर कोणी बोलत असेल तर हा मतदारांवर घेतलेला आक्षेप आहे. जो निकाल लागला त्यामुळे सगळेच सैरभैर झाले आहेत. निवडणूक आयोगाने चर्चे साठी बोलावले चांगली गोष्ट आहे. ईव्हीएमवर आक्षेप आहे, त्यांना सर्वांना चर्चेसाठी बोलावले यातून नक्की मार्ग निघेल असे ते म्हणाले. नाना पटोले यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका करणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांना आवर घालावा, नाना पटोले ज्या पद्धतीने त्या ठिकाणी पदावर कायम आहेत. पण त्यांना निवडून येताना खूप कसरत करावी लागली. पोस्टल मतदानावरती नाना पटोले निवडून आले.

नाना पटोले काँग्रेसमध्ये प्रदेशाध्यक्ष झाले असतील तर त्यांना शुभेच्छा असून शपथविधीसाठी आझाद मैदानात तयारी करायची ठरली तर आम्ही एका दिवसात करू, मी सकाळी त्या ठिकाणाहून आलो त्या ठिकाणी कुठली तयारी दिसली नाही. नाणारमध्ये रिफायनरी होणार नाही, बारसू रिफायनरी प्रकल्प हा माजी मुख्यमंत्र्यांनी इथे आणला आहे.प्रमोद जठार यांनी इच्छा लोकांचे मत बनवावे,रिफायनरी साठी इथल्या लोकांचा विरोध असून मत परिवर्तन झाले तर सरकार त्यांच्यासोबत राहील, तर एकनाथ शिंदे यांनी महायुती सरकारमध्ये राहावे आमची सर्वांची भूमिका आहे. असे मत शिवसनेचे नेते उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## महत्त्वाचे...

### देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे यासाठी विठुरायाची तुळशीपूजा व महाआरती



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर/प्रतिनिधी** : देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे, यासाठी पंढरपुरात भाजप पदाधिकाऱ्यांकडून श्री विठ्ठलाची तुळशी पूजा व महाआरती करण्यात आली. नुकत्याच जाहीर झालेल्या विधानसभा निकालामध्ये भाजपमुळे महायुतीला भरभरून यश आहे. भाजप नेते प्रणव परिचारक तसेच पंढरपुरातील भाजप पदाधिकारी तालुका अध्यक्ष भास्कर कसगावडे, शहराध्यक्ष विक्रम शिरसट, शहरउपाध्यक्ष दीपक येळे, सचिता सगर, महिला शहर उपाध्यक्ष इत्यादी पदाधिकाऱ्यांकडून विठुरायाची तुळशी पूजा व महाआरती करण्यात आली. अशी माहिती भाजप नेते प्रवण परिचारक यांनी दिली.

### माझी ही ईव्हीएम मशीनवर शंका, मी न्यायालयीन लढाई लढणार- कैलास गोरंट्याल



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी** : माझी ही ईव्हीएम मशीनवर शंका आहे. त्यामुळे मी न्यायालयीन लढाई लढणार असल्याचं काँग्रेसचे जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी म्हटलंय. जालन्यात पैशांचा फॅक्टर मोठ्या प्रमाणात चालला. जिथे जिथे मी कामं केलं तिथे तिथे पैशांचा पाऊस पडला असा आरोप गोरंट्याल यांनी केलाय.कटेंगे बटेंगेचाही फॅक्टर निवडणुकीत चालला तसंच ५० खोकेच नव्हे,७० खोके वाटप झाले आणि ७० खोक्यांचा विजय झाला अशी टिका नाव न घेता गोरंट्याल यांनी खोतकर यांच्यावर केलीय. निवडणुकीत हरलो असलो तरी खचून न जाता गाठी भेटी सुरु केल्यायत. आता महानगरपालिका आमचं लक्ष असल्याचं गोरंटयाल यांनी स्पष्ट केलं.

### भारतीय संघटनेतर्फे कोल्हापुरातही एव्हीएम विरोधात आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी** :भारतीय संघटनेच्या वतीने कोल्हापुरात इव्हीएम विरोधात आंदोलन करण्यात आले. कोल्हापुरात भारतीय संघटनेतर्फे इव्हीएम विरोधात आंदोलन करण्यात येत असताना जेष्ठ नेते बाबा आढाव यांनी याआंदोलनाला पाठिंबा दिला. पापाची तिकटी महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर कोल्हापुरकारांच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात निवडणूक आयोग आणि सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली, अशी माहिती ॲड. बाबा इंदुलकर यांनी दिली.

### 'एका वर्षात भारत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल' - निर्मला सीतारमण

दरभंगा (बिहार) : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी दरभंगा येथील क्रेडिट आउटरीच कार्यक्रमात भाग घेतला. कार्यक्रमाचं उद्घाटन करताना निर्मला सीतारमण म्हणाल्या, ''सरकारी योजना देशातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणे आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे हा याम गचा उद्देश आहे. २०४७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र म्हणून प्रस्थापित करण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं स्वप्न हे सामान्य जनता आणि विविध संस्थांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करूनच पूर्ण होऊ शकते''.

अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या की, ''सध्या आपल्या देशाची अर्थव्यवस्था पाचव्या स्थानावर आहे, परंतु पुढील एका वर्षात आपल्या देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या स्थानावर असेल. यासाठी जी काही संसाधने जमा करावी लागतील, ती शक्य तितक्या प्रमाणात पूर्ण केली जात आहेत. सरकारी योजना देशातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवून त्यांना आर्थिकदृष्ट्या मजबूत करणे हा या क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचा उद्देश आहे.''''आधी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिला केंद्रीत अर्थसंकल्प बनवण्याचं आदेश दिलं होतं, पण आता ते महिलांच्या नेतृत्वाखाली आर्थिक विषय घेऊन अर्थसंकल्प बनवण्याचं सांगतात. महिलांना समोर ठेवून भारतीय अर्थव्यवस्था पाचव्या स्थानावर आहे, ती तिसऱ्या क्रमांकावर जाईल.'' - निर्मला सीतारमण, केंद्रीय अर्थमंत्री

## डॉक्टरांचा निष्काळजीपणा महिलेला भोवला; २ वर्षानंतर पोटातून काढली कात्री

**मुंबई/प्रतिनिधी** : मध्य प्रदेशातील भिंड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. याठिकाणी डॉक्टरांनी महिलेवर शस्त्रक्रिया करून तिच्या पोटातून कात्री काढली, तेव्हा पाहणारे सगळेच थक्क झाले. आता या महिलेची प्रकृती धोक्याबाहेर आहे, मात्र डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार तिचा जीव जाऊ शकतो. या महिलेच्या पोटात दोन वर्षे कात्री राहिली.

पोटात कात्री कशी पोहोचली?

आता प्रश्न असा पडतो की महिलेच्या पोटात कात्री कशी पोहोचली? तर ही घटना दोन वर्षापूर्वी घडली, जेव्हा लिअरच्या शासकीय रुग्णालयात महिलेचे ऑपरेशन झाले होते. यावेळी डॉक्टरांनी त्याच्या पोटात कात्री सोडली. कमला असे या महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कमला यांचे २० फेब्रुवारी २०२२ रोजी ग्लॅलियर येथील सरकारी रुग्णालयात कर्करोगाचे ऑपरेशन झाले होते.

दोन वर्षापूर्वी झाले होते ऑपरेशन

जिल्ह्यातील गोहड येथील सौंध गावात राहणाऱ्या कमलाबाई गेल्या दोन वर्षापासून वेदनेने त्रस्त होत्या. कमलाबाईंचे पती कमलेश सांगतात की, वारंवार चाचण्या करून आणि महागडी औषधे घेऊनही आराम मिळत नव्हता. महागड्या औषधांवर गेल्या वर्षभरात खूप पैसा खर्च झाला आहे. काही लोकांकडून कर्जही घ्यावे लागले.

गेल्या काही दिवसांपासून महिलेच्या पोटात सतत दुखत होती. अनेकवेळा औषध घेऊनही वेदना कमी होत नसल्याने डॉक्टरांनी सीटी स्कॅन करण्याचा सल्ला दिला, त्यात पोटात कात्री असल्याचं दिसून आलं. आम्ही हे प्रकरण न्यायालयात नेणार असून डॉक्टरांवर कारवाईची मागणी करणार असल्याचे पीडितेचे म्हणणे आहे.

## सरकार स्थापनेबाबत आम्हाला नियम वेगळे आणि सत्ताधाऱ्यांना वेगळे आहेत; जयंत पाटील यांचा आरोप



दैनिक आपला विदर्भ


**पुणे/प्रतिनिधी** : निकाल लागल्यानंतर २६ नोव्हेंबरपर्यंत सरकार स्थापन व्हायला पाहिजे होते, परंतु आम्हाला नियम वेगळे आणि सत्ताधार्यांना नियम वेगळे आहेत. असा आरोप शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केला.

यावेळी आमदार जयंत पाटील म्हणाल की, सरकार स्थापण होईल, पण २६ नोव्हेंबरच्या आत सरकार स्थापन व्हायला पाहिजे होते, घटनेनुसार २६ नोव्हेंबरपर्यंत सरकार स्थापन झाले नाही, तर राष्ट्रपती राजवट लागणार असे सांगण्यात आले होते. परंतु यांना नियम वेगळे आहेत. त्यामुळे राष्ट्रपती राजवट न लावता सोयीप्रमाणे चालू आहे. ५ ला शपथविधी ४ - ६ ला असे चालू आहे. सत्तातर आता मिळणार आहे. त्यामुळे कोणी कुठे जाणार नाही, सगळे एकच राहणार. त्यामुळे कोण नाराज आणि कोणी नाही याच आता फारस महत्व राहिलं नाही, या देशामध्ये सिस्टिम फॅलो करायच्या नाहीत असा निर्णय विरोधकांसाठी सिस्टिम फॅलो करायच्या सत्तेतील लोकांना काही नियम लागू नाहीत. त्यामुळे राज्यपालांना कळले पाहिजे ना,आमच असे काही ठरले नाही की त्यांना भेटायचे. अनेक ठिकाणी महाराष्ट्रात लोक पुढे येऊन असे सांगतायत जेवढ आम्ही मतदान केले तेवढ त्या मत पेटीत नाहीये, अनेक उदाहरण देण्यात आली आहेत. त्यावरुन लोकांचा इव्हीएम विश्र्वास नाही, मग ईव्हीएमचा आग्रह करताय, तुमचे बहुमत आहे. तुम्ही लोकप्रिय आहात मग बॅलेट पेपरवर मतदान घ्या ना, असा प्रश्र्नही यावेळी जयंत पाटील यांनी केला. आता सरकारनी याबाबत पुढाकार घेऊन सांगावा की बॅलेटवर मतदान घेतले तर आवडेल. काँग्रेसला निवडणूक आयोगाने बोलावले असेल तर ते जातील.असे मत आमदार जयंत पाटील यांनी बोलताना व्यक्त केले.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह राज्यातील नेत्यांशी संवाद साधणार, सत्तास्थापनेपूर्वी भाजपच्या गोटात हालचालींना वेग

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :राज्यातील विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवल्यानंतर महायुती विनासायास सत्तास्थापन करेल, असा अंदाज होता. मात्र, त्यानंतर महाराष्ट्रात सुरु झालेल्या राजकीय नाट्यामुळे महायुतीचा शपथविधी लांबणीवर पडला आहे. आता म हायुतीचा शपथविधी ५ डिसेंबरला होईल, असे सांगितले जात असले तरी एकनाथ शिंदे यांची नाराजी आणि मौन पाहता ५ डिसेंबरला तरी महायुतीचा शपथविधी पार पडेल की नाही, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.



या सगळ्यामुळे महायुती विशेषतः भाजपच्या गोटातील अस्वस्थता वाढली आहे. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राज्यात सत्ता स्थापनेच्या अनुषंगाने चक्र फिरवली जात असल्याचे दिसून येत आहे. अशातच भाजपचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे आता महाराष्ट्रातील नेत्यांशी संवाद साधणार असल्याची माहिती पुढे आली आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काही वेळापूर्वी भाजपच्या नवनिर्वाचित आमदारांची ऑनलाईन बैठक घेतली. त्यामध्ये, भाजपच्या आमदारांनी सरकार स्थापनेपूर्वी आणि स्थापनेनंतर काय-काय काळजी घ्यायची यासंदर्भात या बैठकीत मार्गदर्शन करम्यात आलं आहे. महायुतीतील सर्वच मित्र पक्षांच्या गटनेत्यांची निवड झाल्यानंतर आता भाजपचा गटनेता कधी निवडला जाणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. त्यामुळे, भाजपचा गटनेता म्हणून कुणाची निवड होईल याची देखील राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

तर दुसरीकडे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्रातील नेत्यांशी संवाद साधणार आहेत. भाजपच्या सर्व आमदारांची बैठक २ किंवा ३ डिसेंबरला होण्याची शक्यता आहे. तर ५ डिसेंबर रोजी होणाऱ्या शपथविधीला उपस्थित राहण्याच्या सूचनाही आमदारांना देण्यात येणार आहे. त्यासोबतच महायुती सरकारचा शपथविधी होत असताना आपापल्या जिल्ह्यांमध्ये जल्लोष करण्याचे देखील बावनकुळे यांनी सांगितल्याची माहिती आहे. त्यासोबतच प्रत्येक जिल्ह्यातून भाजपचे महत्त्वाचे पदाधिकारी शपथविधीला उपस्थित राहणार असल्याची माहिती पुढे आली आहे. यावेळी सुरक्षेच्या कारणास्तव पासेस देण्यात आलेल्या व्यक्तींनाच आझाद मैदानात प्रवेश दिला जाईल असेही ठरल्याचं कळतंय.

दरम्यान, मुख्यमंत्री पदाचा चेहरा २ डिसेंबरला स्पष्ट होणार असल्याचे बोलले जात आहे. भाजपचा गटनेता ही २ डिसेंबरला निवडला जाणार असून दुपारी १ वाजता विधान भवनात गटनेता निवडीसाठी बैठक होणार असल्याची माहिती पुढे आली आहे. या बैठकीला भाजपचे सर्व आमदार उपस्थित राहणार आहे.

राज्यात झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला स्पष्टपणे बहुमत मिळाल्यानंतर भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे बॅनर लावले या बॅनर वर देवेंद्र फडणवीस हे शपथ घेत असतानाचा फोटो लावण्यात आलाय याच बॅनर वर राज तिलक की करो तयारी असा मजकूर सुद्धा या बॅनर वर टाकण्यात आले भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य चैतन्य बापू देशमुख यांनी बॅनर लावले

## महाराष्ट्रात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याचा शब्द

### इतर राज्यांमध्ये किती मिळतात? विविध राज्यांना किती खर्च येणार?

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात महायुती सरकारनं जुलै महिन्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. राज्य सरकारनं या योजनेच्या अंमलबजावणीसाठी विशेष दक्षता घेतली. या योजनेच्या माध्यमातून अडीच कोटी महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाची अंम लबजावणी करत नोव्हेंबरपर्यंतचे पाच महिन्यांचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा करण्यात आले. महायुतीची सत्ता आल्यास महिलांना २१०० रुपये देणार असल्याचा शब्द देण्यात आला होता. आता महायुतीची राज्यात सत्ता आली असून महिलांना २१०० रुपये दरमहा दिले जाणार का हे पाहावं लागेल. महाराष्ट्राप्रमाणं इतर राज्यात देखील म हिलांच्या खात्यात थेट रक्कम पाठवणाऱ्या योजना सुरु आहेत. त्या राज्यात महिलांना किती रक्कम दिली जाते हे पाहावं लागेल.



टाइम्स ऑफ इंडियाच्या वृत्तानुसार, कर्नाटक सरकारकडून गृहलक्ष्मी योजना चालवली जाते, या योजनेतून महिलांना २ हजार रुपये दिले जातात. मध्य प्रदेशात लाडली बहेना आणि आसाममध्ये अरुणोदय योजनेतून महिलांना दरमहा १२५० रुपये दिले जातात.

छत्तीसगडमध्ये महतारी वंदन योजनेतून, दिल्ली सरकारकडून मुख्यमंत्री म हिला सन्मान योजनेतून, तामि ळनाडू सरकारच्या मगलीर उरीमई थोगा योजनातून दरमहा १ हजार रुपये म हिलांना दिले जातात.

पश्चिम बंगाल सरकारकडून लक्ष्मी भांडार योजनेतून एक हजार ते १२०० रुपये दिले जातात. ओडिसा सरकार सुभद्रा योजनेतून महिलांना दरमहा ८३३ रुपये देतं. झारखंड सरकारनं देखील म हिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला. हेमंत सोरेन यांनी मुख्यमंत्री होताच ती रक्कम १ हजार रुपये वाढवून अडीच हजारांवर नेण्याचा निर्णय घेतला आहे.

मध्य प्रदेशात शिवराज सिंह चौहान यांच्या सरकारनं सुरु केलेल्या लाडली बहेना योजनेचा त्यांना फायदा झाला होता. भाजपचं सरकार मध्य प्रदेशात पुन्हा स्थापन झालं. महाराष्ट्रात देखील त्या प्रमाणं महायुतीला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा फायदा झाला. महायुतीचं सरकार देखील पुन्हा सत्तेत आलं आहे.

या योजनांचा लाभ प्रामुख्यानं कमी उत्पन्न असलेल्या महिलांना दिला जातो. राज्य सरकारचे कर्मचारी, प्राप्तिकर भरणाऱ्या महिला यांना या योजनेचे लाभ दिले जात नाहीत. महाराष्ट्रात या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी त्या महिलेच्या कुटुंबाचं उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणं आवश्यक आहे.


दरम्यान, महाराष्ट्र सरकारला १५०० रुपयांप्रमाणं महिलांना दरमहा रक्कम देण्यासाठी ४६ हजार कोटींचा खर्च अपेक्षित होता. ज्यावेळी महिलांना २१०० रुपये दिले जातील त्यावेळी सरकारला ५८ हजार कोटी रुपये खर्च करावे लागतील. देशातील विविध राज्यातील सरकारांना अशा योजनांवर साधारपणे १ लाख कोटी रुपयांचा खर्च करावा लागत असल्याची माहिती आहे.

# बुलढाण्यात महायुतीत ठिणगी...

## निवडणुकीत मी एकटाच लढलो... माझ्यासोबत कुणीही नव्हतं..

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि आमदार संजय कुटे यांनी माझ्या विरोधातील उमेदवाराच तिकीट फायनल केलं

## आमदार संजय गायकवाडांच्या आरोपाने जिल्ह्यात खळबळ...



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : शिंदेंच्या शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड हे विधानसभा निवडणुकीत फक्त आठशे मतांच्या मताधिक्याने निवडून आलेत आणि त्यामुळे अगदी काठावर पास झाल्याची भावना त्यांच्या जिव्हारी लागल्याचं समोर येत आहे... आमदारा संजय गायकवाड यांचा बुलढाण्यात एका कार्यक्रमात सत्कार झाला त्यावेळी बोलताना संजय गायकवाड म्हणाले की, निवडणुकीत मी एकटाच लढलो... माझ्यासोबत कुणीही नव्हतं.. इतकच काय तर मित्रपक्षानेही मला मदत केली नाही... तर जिल्ह्यातील केंद्रीय मंत्री तसेच आमदार संजय कुटे यांनी मदत तर सोडाच पण त्यांनी माझ्या विरोधात उमेदवाराचे तिकीट फायनल केल्याचा खळबळ जनक गौप्यस्फोट संजय गायकवाड यांनी केल्याने जिल्ह्यात मात्र राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे... आणि त्यामुळे जिल्ह्यातील शिंदे यांची शिवसेनेत अंतर्गत युद्ध तर मित्र पक्षांमध्येही ऑल इज नॉट वेल ...! असल्याच समोर आल आहे.

## चंद्रपुरात वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू; धाराशिवमध्ये बिबट्याचा वावर, ९ जनावरे फस्त, वन विभाग अलर्ट

**धाराशिव-चंद्रपूर/प्रतिनिधी** : विदर्भातील चंद्रपूर (जिल्ह्यातील अभयारण्यात वाघांचा वावर असतो, येथील व्याघ्र दर्शनासाठी देशभरातून पर्यटक येतात. मात्र, कधी-कधी या वाघांकडून स्थानिक रहिवाशांच्या जीवावर बेतल्याच्या घटनाही घडल्या आहेत. आता, पुन्हा एकदा अशीच घटना समोर आली असून, वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. येथील सावली तालुक्यातील निलसनी-पेडगाव परिसरातील जंगलात ही दुर्दैवी घटना घडली. रेखाबाई मारोती येरमलवार (५५) असे मृत महिलेचे नाव असून झाडणी (केरसुणी) साठी लागणारं गवत आणण्यासाठी त्या जंगलात गेल्या होत्या. त्यांच्यासोबतच्या महिलांनी महिलेवर वाघाने हल्ला केल्याची माहिती गावात दिली. त्यानंतर, वनपथक घटनास्थळी पोहोचले असून ग्रामस्थांमध्ये रोष निर्माण झाला आहे. दुसरीकडे धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यात बिबट्या आढळून आल्याने नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झालं आहे. चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात महिला मृत्यूमुखी पडल्याची घटना ताजी असतानाच धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यात गेल्या काही दिवसात बिबट्याचा वावर पहायला मिळाला. त्यामुळे लोकांमध्ये प्रचंड दहशतीचं वातावरण पसरलं आहे. बिबट्याने शेतातील लहान मोठी ९ जनावरे फस्त केल्याने ग्रामस्थांची भीती अधिकच वाढली आहे. बिबट्याला पकडण्यासाठी वनविभागाकडून ट्रॅप लावण्यात आला, मात्र बिबट्या अद्याप पिंजऱ्यात सापडला नाही.

## राज्यातील अनेक पराभूत उमेदवाराची व्हीव्हीपॅट मोजणीची मागणी, काही उमेदवारांनी भरले शुल्क

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीत अनेक ठिकाणी अनपेक्षित निकाल लागले. काही ठिकाणी पराभूत उमदवारांनी झालेल्या मतमोजणी बाबत आक्षेप घेतला. तर काही जणांनी व्हीव्हीपॅट मतमोजणीसाठी विनंती अर्ज देखील केले. यासंदर्भात राज्यातील २२ उमेदवारांनी अर्ज केले असून जिल्ह्यातील शिवसेनेचे (उबाठा) उमेदवार बाळासाहेब थोरात यांच्यासह अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांनी या मतमोजणीची मागणी केलीय. तर सिल्लोड येथील उमेदवार सुरेश बनकर यांनी या प्रकरणी न्यायालयात जाण्याचा इशारा दिलाय.

मध्य मतदार संघाच्या उमदवारानं भरले पैसे : जिल्ह्यात शिवसेनेच्या (उबाठा) उमेदवारांनी मतमोजणीत तफावत असल्याचा आरोप केलाय. तसंच काही मतदान केंद्रातील मतमोजणी योग्य पद्धतीनं झाली नसल्याची तक्रार देखील पराभूत उमेदवारांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. जिल्ह्यातील पश्चिम आणि मध्य विधानसभा मतदार संघातील शिवसेनेचे (उबाठा) पराभूत उमेदवार राजू शिंदे आणि मध्य विधानसभा मतदार संघातील बाळासाहेब थोरात यांनी व्हीव्हीपॅट मोजणी करण्याची मागणी केलीय. इतकंच नाही तर बाळासाहेब थोरात यांनी मतदान केंद्रातील मोजणीसाठी लागणारे ४७,२०० रुपये प्रति मतदान केंद्राप्रमाणे दोन केंद्रांचे ९४ हजार ४०० रुपये निवडणूक विभागात भरले आहेत. यासंदर्भातील माहिती त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना दिली. त्याचबरोबर कन्नड येथील अपक्ष उमेदवार हर्षवर्धन जाधव यांनी देखील आयोगाकडं तक्रार नोंदवली आहे.

सिल्लोड मतमोजणी वादात : जिल्ह्यातील सिल्लोड मतदार संघात राज्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांच्या विरोधात भाजपामधून शिवसेनेत (उबाठा) आलेल्या सुरेश बनकर यांच्यातील लढत महत्त्वाची ठरली. बनकर यांनी चांगले मताधिक्य मिळवत आघाडी घेतली असताना शेवटच्या काही फेऱ्यांमध्ये अचानक सत्तार यांनी आघाडी घेत विजय मिळवला. त्यामुळं मतमोजणी करत असताना चुकीची आकडेवारी जाहीर करण्यात आल्याचा आरोप सुरेश बनकर यांनी केलाय. तसंच या प्रकरणी न्यायालयात दाद मागणार असल्याचा इशाराही त्यांनी दिलाय.

पुन्हा मतमोजणीसाठी लागेल न्यायालयीन परवानगी : निवडणुकीच्या निकालावर अनेक उमदवारांनी आपला आक्षेप नोंदवलाय. मात्र, नव्याने मतमोजणी करण्याचा निर्णय घेणे आयोगाला शक्य नाही. जर एखाद्या उमेदवाराला सर्व मतमोजणी पुन्हा करायची असेल, तर न्यायालयातूनच ती परवानगी मिळवावी लागते. त्यानंतर नियमानेच पुढची कारवाई होऊ शकते, अशी माहिती निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी दिलीय.

## अब्दुल सत्तारांच्या अडचणी वाढल्या

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीत सत्ता स्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. एकीकडे राज्याचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या सोबत झालेल्या बैठकीत १२ मंत्रिपदाची मागणी केली आहे. मात्र शिंदे गटाच्या चार नेत्यांच्या मंत्रिमंडळात समावेशाला भाजपने आक्षेप घेतल्याची माहिती समोर आली. यात अब्दुल सत्तार यांच्या नावाचा देखील समावेश असताना आता त्यांच्या अडचणीत वाढ झाल्याचे दिसून येत आहे. कारण अब्दुल सत्तार यांच्याविरोधात सिल्लोड न्यायालयात फौजदारी याचिका दाखल करण्यात आली आहे. निवडणूक शपथपत्रात खोटी माहिती दिल्याप्रकरणी ही याची दाखल करण्यात आली आहे.



सिल्लोड येथील सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपेल्ली आणि पुणे येथील डॉ. अभिषेक हरिदास यांनी अब्दुल सत्तार यांच्या नामनिर्देशन पत्र सोबत सादर केलेल्या शपथबद्ध शपथपत्रावर मतदानापूर्वीच लेखी आक्षेप सादर केला होता. परंतु या आक्षेपावर निवडणूक आयोगाने अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे शपथपत्रात खोटी, भ्रामक आणि दिशाभूल माहिती देणे हा लोकप्रतिनिधी अधिनियम १९५१ कलम १२५ अ नुसार गुन्हा आहे. तक्रारीबाबत आयोगाने कोणतीच कारवाई न केल्यामुळे या प्रकरणात सिल्लोड दिवाणी तथा फौजदारी न्यायालयात फौजदारी याचिका दाखल करण्यात आली आहे.

याचिकेत गंभीर आरोप

अब्दुल सत्तार हे सातत्याने प्रत्येक निवडणुकीत खोटी माहिती देऊन निवडणूक लढवत आहेत, त्यामुळे मतदारांची फसवणूक होऊन मानव अधिकार हक्काचा भंग होत आहे, असा गंभीर आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेत अब्दुल सत्तार अब्दुल नबी व निवडणूक निर्णय अधिकारी लतीफ इब्राहिम पठाण यांना प्रतिवादी बनविण्यात आले आहे. यामुळे अब्दुल सत्तार यांच्या अडचणी वाढल्याचे दिसून येत आहे.

उमेदवारी रद्द करण्याची मागणी

दरम्यान, काही दिवसांपूर्वी महेश शंकरपेल्ली यांनी अब्दुल सत्तार यांच्या निवडणूक शपथपत्रात १६ चुका असल्याचे सांगताना त्यांची उमेदवारी रद्द करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती. यात त्यांनी सत्तारांनी शपथपत्रात दाखवलेल्या मालमत्तेचा तपशील आणि प्रत्यक्ष मालमत्ता यामध्ये प्रचंड तफावत आहे. अनेक मालमत्तांचे क्षेत्रफळ हे चुकीचे दाखवण्यात आले आहे. काही मालमत्तेची माहिती शपथ पत्रातून गायब करण्यात आली आहे. विविध सहकारी संस्थांमध्ये सत्तार त्यांच्याकडे असलेल्या शेअर्सबाबतही खोटी माहिती देण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला होता.

## अक्षयच्या अकाली निधनाने हळहळले समाजमन

### शिवस्मारक उभारण्यासाठी घेतला होता पुढाकार : दोस्तीच्या दुनियेतील राजा माणूस हरपला

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : उमदे नेतृत्व... समाजासाठी सतत काहीतरी करण्याची तळमळ.... सुखदुःखात सतत पुढे रहात असलेल्या मैत्रीच्या दुनियेतील राजा माणूस अशी ओळख असलेल्या अक्षय (सोनू) पळसकर यांचे दि २८ नोव्हेंबर रोजी अपघाती अकाली निधन झाल्याने दोस्तीच्या दुनियेतील राजा माणूस काळाच्या पडद्याआड गेल्याची भावना व्यक्त करत संपूर्ण समाज मन हळहळले. अक्षयाच्या अपघाताची बातमी कळताच मन सुन्न झाले.

डोणगाव येथील उत्कृष्ट शेतकरी तथा माऊली रोपवाटिकेचे संचालक अक्षय ज्ञानेश्र्वर पळसकर हे कामानिमित्त जळगाव खान्देश येथे जात असताना जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यातील वाकोडी येथे दि.२८ नोव्हेंबरच्या रात्री ८.३० वाजताच्या दरम्यान समोरील वाहनाच्या प्रकाशानाने दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि रस्त्याच्या कडेला सार्वजनिक शौचालयावर जाऊन अक्षय आदळला.या अपघातत अक्षय चा जाग्यावरच मृत्यू झाला.

अक्षय पळसकर हा एक होतकरू व्यावसायिक मुलगा होता अत्यंत मनमिळावू व सर्वांनासोबत घेऊन चालण्यासोबतच प्रत्येकाला मदत करण्याची वृत्ती, मनमिळाऊ पणा यासह प्रत्येकाच्या सुखदुःखात हिरीरीने भाग घेणाऱ्या अक्षय उर्फ सोनू हा सर्वाच्या गळ्यातील ताईत बनला होता. डोणगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारक व्हावे, यासाठी अक्षय मित्रासह उपोषण, आंदोलने केली. ग्रामपंचायत प्रशासनाकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी जागाही उपलब्ध करून घेण्यासाठी पुढाकार घेतला. गत काही महिन्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्याची गळ घातली. सामाजिक कार्याबरोबरच अक्षयला क्रिकेटचा छंद असल्याने तो डोणगावच नव्हे तर संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात क्रिकेटपट्टू म्हणून ओळखला जात होता. त्यामुळे अक्षयचा मित्र वर्ग हा मोठ्या प्रमाणात होता. सामाजिक, राजकीय, यासह क्रीडा क्षेत्रातील योगदानामुळे अक्षय पळसकर यांची ओळख संपूर्ण तालुक्यात होती. एक उमदे नेतृत्व म्हणून अक्षय (सोनू) पळसकर यांच्याकडे पाहिले जात होते. नुकतेच त्यांनी नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांना विजय झाल्यानंतर अभिनंदन करीत डोणगाव येथील छत्रपती शिवस्मारक करून देण्याची विनंती केली होती. तर, नवनिर्वाचित आमदार सिद्धार्थ खरात यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक लवकरच पूर्णत्वासने असे आश्र्वासन दिले होते.

मात्र नियतीने घात करत मित्रांच्या स्वप्नातील शिवस्मारक पूर्ण करण्यासाठी सतत धडपडणाऱ्या अक्षय उर्फ सोनू यांचा अपघाती मृत्यू झाल्याने त्यांच्या संपूर्ण मित्र परिवारावर शोककळा पसरली आहे. तर शिवस्मारक पाहण्याची अक्षयची इच्छा अपूर्ण राहिली आहे. एका मनमिळाऊ मित्राचे अकाली निधन झाल्याने मित्रपरिवार तर शोक सागरात बुडालाच आहे. त्याचबरोबर संपूर्ण समाजमन हळहळले आहे.








### अर्ध्यावरती डाव मोडला

अक्षय पळसकर याला तीन वर्षाची मुलगा व एक पाच वर्षाचा मुलगा आहे. सुखी स्वप्न सुखी संसाराचे स्वप्न रंगवीत असताना नियतीने मात्र अक्षय चा घात घेतला. त्यामुळे अक्षयचा संसार अर्ध्यावरती मोडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. अक्षय पळसकर यांच्या पश्र्चात पत्नी दोन मुले,आई,वडील,भाऊ असा परिवार आहे.त्यांच्या सावडण्याचा कार्यक्रम सोमवार दि.२ डिसेंबर २०२४ रोजी डोणगाव येथील माऊली रोपवाटिका येथे सकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी आयोजित करण्यात आला आहे. अक्षय उर्फ सोनू याला आपला विदर्भ परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली..

---

## विविध वृत्त...

### ‘ईव्हीएम’ मध्ये हेराफेरी करून निवडणूका जिंकुन देण्याची सुपारी घेणाऱ्या निवडणूक आयोगाविरुध्द ९ डिसेंबरला विशाल ‘मशाल’ मोर्चा



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीत ईव्हीमध्ये हेराफेरी करून निवडूका जिंकुन देण्याची सुपारी घेणाऱ्या निवडणूक आयोगाविरूध्द ९ डिसेंबर रोजी विशाल ’मशाल’ काढण्यात येणार आहे. या मोर्चात ईव्हीएम प्रणालीवर नाराज धुळेकर जनतेने प्रचंड संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन माजी आमदार तथा शिवसेना उबाठा पक्षाचे धुळे शहर विधानसभा मतदार संघातील उमेदवार अनिल गोटे यांनी केले आहे. दरम्यान, निवडणुकीपुर्वी विविध पक्ष, प्रसारमाध्यमांनी केलेल्या सव्र्व्हेमध्ये धुळेकर नागरिकांची आपल्याच नावाला पहिली पसंती होती. दुसऱ्या स्थानी माजी आमदार फारुक शाह तर तिसऱ्या स्थानी भाजपाचा उमेदवार होता. त्यामुळे भाजपा उमेदवारास जी मते पडली ती आपली वळवलेली मते आहेत, असा दावाही अनिल गोटे यांनी यावेळी केला.

### सिंधुदुर्ग ते मुंबई विमानसेवा पुन्हा सुरु करा!

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबईहून थेट तळकोकणात जाण्यासाठी तीन वर्षासाठी करार पद्धतीने सिंधुदुर्ग ते मुंबई विमानसेवा सुरू करण्यात आली होती. मात्र २६ ऑक्टोबर रोजी मुदत संपल्यानंतर चिपी-मुंबई विमानसेवा बंद करण्यात आली. परंतु लाखो पर्यटकांच्या पसंतीस उतरलेल्या या विमानसेवेला कोकणवासीयांचा चांगला प्रतिसाद लाभला होता. त्यामुळे खासदार नारायण राणे यांनी ही विमानसेवा पुन्हा सुरु करावी अशी मागणी नागरी विमान वाहतूक मंत्र्यांकडे केली आहे.

खा. नारायण राणे यांनी वाहतूक मंत्र्यांकडे विमानसेवेबाबत जारी केलेल्या निवेदनानुसार मुंबई - चिपी (सिंधुदुर्ग विमानतळ) अशी कार्यान्वित असलेली सेवा खूप चांगली होती. सणासुदीच्या काळात तसेच अन्य वेळीही मोठा फायदा प्रवाशांना आणि पर्यायाने कंपनीला होत असायचा. हंगामाच्या वेळी तर एका मार्गासाठी २५ हजारापर्यंत तिकीट देऊन प्रवाशांनी प्रवास केला आहे. या दरम्यान कधीकधी हवामान, तसेच अन्य तांत्रीक कारणामुळे विमानसेवा विस्कळीत झाल्याने त्याचा फटका प्रवाशीसंख्येवरही झाला. परंतु फ्लाइट नेहमीच बुक केल्या गेल्या.

पर्यटक, स्थानिक प्रवासी आणि जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेला गती मिळावी यासाठी सिंधुदुर्ग विमानतळावरील सेवा त्वरीत कार्यरत व्हावी, अशी मागणीही खा. नारायण राणे यांनी नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू यांच्याकडे केली आहे.

### आता अंघोळ करणेही महागणार! कंपन्यांनी वाढवले ’या’ साबणांचे दर

**मुंबई/प्रतिनिधी** : देशभरात सातत्याने महागाईचा भडका उडताना दिसून येत आहे. सोन-चांदी, भाजीपाला, खाद्य तेल, फळे, पेट्रोल-डिझेल अशा दैनंदिन वापरातील अनेक वस्तूंचे दर वाढत चालले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसत आहे. अशातच आता ही महागाई बाथरूमकडेही वळली आहे. साबण बनवणाऱ्या कंपन्यांनी साबणाच्या किमतीत वाढ केली आहे. त्यामुळे आता अंघोळ करणेही महाग होणार असल्याचे चिन्ह दिसून येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, इंडोनेशिया आणि मलेशियामधून आयात केले जाणाऱ्या शुल्कात वाढ ३५-४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सध्या पामतेलाचा भाव सुमारे १,३७० रुपये प्रति १० किलो आहे. त्यामुळे देशातील दैनंदिन ग्राहकोपयोगी वस्तू कंपन्यांनी अंघोळीच्या साबणाच्या किमतीत ८ टक्क्यांनी वाढ केली आहे.

कोणत्या साबणाचे वाढले दर?

डव्ह, लक्स, लाईफबॉय, थ्रीग्त, झ्गीम, ीेंदहर या ब्रँड्सच्या किमती वाढवल्या आहेत. दरम्यान, इश्ण्उ क्षेत्रात सहसा एक कंपनी आधी किमती वाढवते, त्यानंतर हळूहळू इतर कंपन्याही किमती वाढवतात. त्याच धर्तीवर एचयूएल आणि विप्रोनंतर इतर कंपन्याही साबणाच्या किमती लवकरच वाढण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### अदाणींच्या मुद्द्यावर विरोधकांमध्ये मतभेद, काँग्रेसशी तृणमूलची फारकत; अधिवेशनातील धोरणावर वेगळी भूमिका!

**मुंबई/प्रतिनिधी** : संसदेच्या हिवाळी अधिवेशनात काँग्रेसने उद्योगपती गौतम अदणींवर अमेरिकेत लावण्यात आलेल्या कथित लाचखोरीच्या आरोपांवर चर्चा घेण्याची मागणी लावून धरली आहे. यामुळे संसदेचे कामकाज तिसऱ्या दिवशीही विस्कळीत राहिले. यादरम्यान आता तृणमूल काँग्रेस पक्षाने मात्र काँग्रेसपेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. संसदेत तिसरा सर्वात मोठा विरोधी पक्ष असलेल्या टीएमसीने मात्र लोकांशी निगडीत महत्वाचे मुद्दे मांडता यावेत तसेत त्यांच्यावर चर्चा व्हावी यासाठी सभागृहाचे कामकाज चालू राहावे अशी इच्छा व्यक्त केली आहे.

२०२१ साली काँग्रेस पक्षाने डाव्या पक्षांसोबत युती करत ममता बॅनर्जी यांच्या टीएमसी विरोधात पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक लढवली होती. तेव्हापासून काँग्रेस आणि टीएमसी या दोन पक्षांमध्ये तणाव वाढला आहे. लोकसभा निवडणूकीत देखील काँग्रेस आणि डाव्या पक्षांची युती होती, ज्यामुळे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि टीएमसीच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी यांनी विरोधकांच्या इंडिया आघाडीपासून अंतर राखले.